# प्रेसनोट

दि.२४/०२/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | तोफखाना पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | रामेश्वर भागवत गोरे, तलाठी, वर्ग—३, नेमणुक—सजा खांडके, ता.नगर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दिनांक २०/०२/२०२३ रोजी त्यांचे नावावरील ४८ गुंठे जमीन विकली होती. विक्री केलेनंतर सदर जमीनीची नोंद शासकीय अभिलेखात करुन देण्याची जबाबदारी तक्रारदार यांनी घेतली होती. दि.२१/०२/२०२३ रोजी तक्रारदार यांनी सदर दस्त व सुची २ हे आरोपी लोकसेवक रामेश्वर भागवत गोरे, तलाठी, वर्ग—३, नेमणुक—सजा खांडके, ता.नगर, जि.अहमदनगर यांना देऊन खरेदी घेणारे व्यक्तीचे नावाची नोंद शासकीय अभिलेखात घेऊन फेरफार मिळणेकामी विनंती केली होती. त्यावेळी आरोपी लोकसेवक याने तक्रारदार यांचेकडे रुपये ५०००/— ची मागणी केली. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांचेकडे आज दि.२४/०२/२०२३ रोजी तक्रार केली. सदर तक्रारीचे अनुषंगाने आज दि.२४/०२/२०२३ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक रामेश्वर भागवत गोरे याने पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे रुपये ५०००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेवरुन आज दि.२४/०२/२०२३ रोजी सुरभी हॉस्पिटल चौकात लाचेचा सापळा आयोजित केला असता आरोपी लोकसेवक गोरे याने तक्रारदार यांना लाचेची रक्कम फोन पे व्दारे त्याचे बँक खातेवर टाकणेस सांगितले व ५०००/— रुपये त्याचे स्वत:चे खात्यावर आलेबाबत खात्री करुन तेथुन निघुन गेला. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल वरुन आरोपी लोकसेवक यांचे मोबाईलवर फोन पे व्दारे पाठविलेले ५०००/— रुपये आरोपी लोकसेवक गोरे याचे खात्यावर वर्ग झाल्याची पंचासमक्ष खात्री करुन आरोपी लोकसेवक याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले आहे. सदर बाबत तोफखाना पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:— ९९३०९९७७००

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर